RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक ५१] शुक्रवार, एप्रिल २७, २०१८/वैशाख ७, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ११५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ एप्रिल २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम.**

क्रमांक जमीन २०१७/प्र. क्र. ९९/ज-१अ.—महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम (१९४८ चा ६७) याच्या कलम ८२ च्या पोट-कलम (२) खंड (इइ) तसेच त्याच्या कलम १७ ब च्या पोट-कलम (१) आणि कलम १८ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन नियम, १९५६ यांत आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे ; ते उक्त कलम ८२ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी पूर्वप्रसिद्ध करण्यात आलेले आहेत :—

१. या नियमांना मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (सुधारणा) नियम, २०१७ असे म्हणावे.

२. मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन नियम, १९५६ (यात यापुढे याचा निर्देश "मुख्य नियम" असा करण्यात आला आहे) याच्या नियम ११ नंतर, पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल :—

**" ११अ. शेतमजूर व कारागिरांच्या राहत्या घरांच्या जागा यांच्याबाबतचे अधिकार अभिलेख तयार करण्याची रीत.**

(१) शेतमजूर व कारागिरांच्या मालकीच्या जमिनीव्यतिरिक्त इतर व्यक्तींच्या जमिनीवर त्यांनी भोगवटा केलेल्या राहत्या घरांच्या व त्याखालील जमिनींच्या हक्कांचा अधिकार अभिलेख गावामध्ये तयार करण्याच्या आपल्या हेतूस यथोचित प्रसिद्धी देऊन, तलाठी असा अधिकार अभिलेख तयार करील.

(२) उप-नियम (१) अन्वये तयार केलेल्या अधिकार अभिलेख यांमध्ये नियम ११ मध्ये दर्शविलेल्या बाबींच्या तपशिलाचा अंतर्भाव असेल, आणि तो तपशील नमुना अ-१ मध्ये नमूद असेल. नमुना अ-१, " शेतमजूर व कारागिरांच्या भोगवट्यात असलेल्या, त्यांच्या राहत्या घरांचा आणि त्याखालील जमिनीच्या ठिकाणांचा तपशील " असे शीर्षक दिलेल्या नोंदवहीमध्ये देखील, ठेवण्यात येईल.

(३) तलाठी उक्त नमूद नमुना अ-१ मधील माहिती संबंधित तहसीलदार यांना पाठवील, जो सदर माहिती गावातील चावडीमध्ये नोटीस चिकटवून किंवा दवंडी देऊन किंवा स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन त्याची यथोचित प्रसिद्धी केल्यानंतर, हितसंबंधित व्यक्तींकडून दावे व हरकती मागवण्यासाठी त्याने अशी माहिती प्रसिद्ध केलेल्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत असे दावे किंवा हरकती सादर करण्यास त्यांना फर्मावील.

(४) संबंधित तहसीलदार, त्यांच्याकडे हरकती व सूचना प्राप्त झाल्यास, अशा प्रकरणांची चौकशी करून आणि संबंधित व्यक्तींना सुनावणीद्वारे त्यांची बाजू मांडण्याकरिता पुरेशी संधी देऊन, अशी प्रकरणे निर्णित करील.

(५) गाव नमुना नं.७ च्या इतर हक्क सदरी अशा राहत्या घराखालील जमिनीच्या ठिकाणांच्या अधिकार अभिलेख विषयक नोंदी घेण्यात येतील.

(६) तहसीलदार यांच्या निर्णयाविरुद्ध उप विभागीय अधिकारी यांच्याकडे अपिल दाखल करता येईल व उप विभागीय अधिकारी यांचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

३. मुख्य नियमांसोबत जोडलेल्या नमुन्यांमध्ये नमुना १ च्या आधी पुढील नमुना समाविष्ट करण्यात येईल :—

**" नमुना " अ-१**

**(कलम १८ व नियम ११ अ पहा)**

(शेतमजूर व कारागिरांच्या भोगवट्यात असलेल्या, त्यांच्या राहत्या घरांचा आणि त्याखालील जमिनीच्या ठिकाणांचा तपशील)

| अ. क्र. | मालकाचे नाव | कोणतेही कुळ असल्यास, त्याचे नाव | द्यावयाचा खंड/ देय भाडे | राहत्या घरांखालील जागेचे अदमासे क्षेत्रफळ | सर्व्हे नंबर/ गट नंबर/ भूमापन क्रमांक | पोट हिस्सा नं. | सीमा/हद्दी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | | | | | | | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र क्षीरसागर,**
शासनाचे सह सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Road,Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 27th April 2018

*NOTIFICATION*

MAHARASHTRA TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT.

No. Jamin-2017/C.R.99/J1A.—In exercise of the powers conferred by clause (ee) of sub-section (*2*) of section 82 of the Maharashtra Tenancy and Agricultural Lands Act (LXVII of 1948) read with sub-section (*1*) of section 17B and clause (*a*) of section 18 thereof; and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Tenancy and Agricultural Lands Rules, 1956; the same having been previously published as required by sub-section (*3*) of the said section 82, namely :—

1. These rules may be called the Bombay Tenancy and Agricultural Lands (Amendment) Rules, 2017.

2. After rule 11 of the Bombay Tenancy and Agricultural Lands Rules, 1956 (hereinafter referred to as "the principal rules"), the following rule shall be inserted, namely :—

"**11A. Manner of preparing record of rights for dwelling houses of agricultural labourers and artisans.**—(*1*) The Talathi shall, after giving due publicity of his intention to do so, prepare a record of rights of the dwelling houses and sites thereof, in the village, occupied by agricultural labourers and artisans, on the land of the persons other than the land owned by them.

(*2*) The record of rights prepared under sub-rule (1) shall contain the particulars indicated in rule 11 and shall be in Form A-1. The Form A-1 shall also be maintained in a register titled as ' Details of dwelling houses and sites thereof occupied by agricultural labourers and artisans'.

(*3*) The Talathi shall forward the Form A-1, to the concerned Tahsildar, who shall, after due publication thereof by notice affixed on village Chawadi or Dawandi or advertisement in a local newspaper, call for claims and objections from interested persons requiring them to submit such claims or objections within a period of thirty days from the date of its publication.

(*4*) The Tahsildar shall, after considering the claims and objections (if any) received, after conducting the enquiry and after giving the persons concerned a reasonable opportunity of being heard, decide the matter.

(*5*) The record of rights regarding the dwelling sites shall thereupon be entered into Village Form VII in the other rights column.

(*6*) An appeal against the decision of the Tahsildar shall lie to the Sub-Divisional Officer whose decision thereon shall be final.".

3. In the forms appended to the principal rules, before Form I, the following form shall be inserted, namely :—

**"Form" A-1**

(*See* section 18 and rule 11A)

**(Details of dwelling houses and sites thereof occupied by agricultural labourers and artisans)**

| Sr. No. | Name of Owner | Name of Tenant, if any | Rent Payable | Approximate area of dwelling house and site | Survey No./ Gut No./ C.T.S. No. | Pot-Hissa No. | Boundaries |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA KSHIRSAGAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.